**<u>विशेष दिवाणी दावा क्र.३०/२०२५ मधील निशाणी क्र.६ खालील आदेश</u>**
**<u>[अमोदी विरुध्द शेख जलील व इतर]</u>**

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे वाद मिळकतीसंदर्भात जैसे थे ठेवा परिस्थितीत कायम ठेवणे संदर्भात दाखल केलेला आहे.

२. वादीतर्फे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा चल संपत्तीबाबत जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी वाद मिळकतीसंदर्भात दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे व प्रतिवादी वादीच्या वाद मिळकतीच्या ताब्यात हरकत व अडथळा निर्माण करीत आहेत. प्रतिवादी क्र.१ ने वादी विरोधात याच वाद मिळकतीसंबंधी विशेष दिवाणी क्र.२९/२०२५ प्रतिवादी विरोधात दाखल केला असून तो आजच्या बोर्डावर आदेशासाठी आहे.

३. संचीकेचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी म्हणत असल्याप्रमाणे त्याचा वाद मिळकतीवर काय म्हणुन ताबा आहे हे कागदपत्रावर व आलेल्या पुराव्यावरुन ठरेल सद्यस्थितीत याबाबतीत जास्त उहापोह करण्याची आवश्यता नाही. अदयाप प्रतिवादींचे निशाणी क्र.५ वर म्हणणे येणे बाकी आहे व प्रतिवादींना त्याची संधी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. जरी तशी संधी दिली तरी वादीचे नुकसान नाही व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणे सोपे होईल. सद्यस्थितीत अर्ज मंजुरीकरीता सबळ कारण नाही करिता आदेश.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज निशाणी क्र.६ नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2025.07.18 12:25:37 +0530

(सु. श. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिल्लोड.

दिनांक : १८/०७/२०२५.